Impact Factor-7.675 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar

Peer-Reviewed Indexed
**Multidisciplinary International Research Journal**
November -2020
SPECIAL ISSUE NO - CCLX (260)

# INDIAN WOMEN : PRESENT, PAST AND FUTURE



Chief Editor
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

Executive Editor:
Dr.R.M.Hajari
Principal
Sham Gadale Art's Collage,
Dahiphal (Wadmauli)
Tq.KAJJ,.Dist. BEED.

Editor:
Dr.S.N.Jadhavar
Head, Deptt. of History,
Sham Gadale Art's Collage,
Dahiphal (Wadmauli)
Tq.KAJJ,.Dist. BEED.

## The Journal is indexed in:

Scientific Journal Impact Factor (SJIF)
Cosmos Impact Factor (CIF)
International Impact Factor Services (IIFS)

Late Ramesh Warpudkar Colleege Sonpeth Dist. Parbhani (M.S.)

For Details Visit To : *www.aadharsocial.com*
Aadhar Publications

Impact Factor – 7.675 ISSN – 2278-9308

# B.Aadhar

Peer-Reviewed Indexed

***Multidisciplinary International Research Journal***

**November - 2020**

**ISSUE No – CCXLIV (260)**

## INDIAN WOMEN : PRESENT, PAST AND FUTURE

Prof. Virag.S.Gawande
Chief Editor :
Director
Aadhar Social Research &, Development Training Institute, Amravati.

Dr.S.N.Jadhavar
Editor :
Head, Deptt. of History,
ham Gadale Art's Collage, Dahiphal (Wadmauli) Tq.KAJJ,.Dist. BEED.

Dr.R.M.Hajari
Executive Editor:
Principal
Sham Gadale Art's Collage, Dahiphal (Wadmauli) Tq.KAJJ,.Dist. BEED.

**Aadhar International Publications**

For Details Visit To : www.aadharsocial.com

© All rights reserved with the authors & publisher

Late Ramesh Warpudkar Colleege Sonpeth Dist. Parbhani (M.S.)

| | | |
|---|---|---|
| 70 | हैदराबाद मुक्ती संग्रामातील महिलांचे योगदान :संक्षिप्त आढावा<br>प्रा.प्रेमचंद गुंडू गायकवाड | 278 |
| 71 | गानसम्राज्ञी किशोरीताई अमोणकर प्रा.संतोष किसनराव खंडारे | 282 |
| 72 | वडार मजूर स्त्रिया: सद्यस्थिती व वास्तव डॉ. जगन्नाथ सावंत | 285 |
| 73 | हिन्दुस्तानी शास्त्रीय गायनमें महिला कलाकारोंका योगदान : कल और आज<br>डॉ. स्नेहल द.शेंबेकर | 291 |
| 74 | भारतीय स्त्रीयांच्या अग्रज्योती -क्रांतीसूर्य महात्मा जोतीबा फुले.<br>शातलवार रमाकांत शिवजीराव | 295 |
| 75 | संगीतातील उपशास्त्रीय गीतप्रकारात– शोभा गुर्टू यांचे योगदान<br>डॉ. स्नेहल द. शेंबेकर | 297 |
| 76 | महाराष्ट्रातील दलित चळवळ : डॉ.बी.आर.आंबेडकर पूर्व कालखंड<br>शरद बाबुराव सोनवणे | 301 |
| 77 | भारतातील लिंगाधारित अत्याचार आणि महिला विकास<br>प्रा डॉ सुनिता आत्माराम टेंगसे | 304 |
| 78 | कौटुंबिक हिंसाचार : भारतीय महिला प्रा.डॉ.तोटे दादासाहेब सर्जेराव | 310 |
| 79 | दिल्लीच्या तख्तावर विराजमान होणारी पहिली स्त्री शासक :रजिया सुलतान<br>प्रा.उषा पोपटराव गायकर | 312 |
| 80 | ग्रामीण महिलांच्या आरोग्य विषयक समस्या–एक चिकित्सक अभ्यास<br>प्रा.वाघुले सुवर्णा अंकुशराव | 316 |
| 81 | नवाब सुल्तान जहा बेगमचे कार्ये प्रा.डॉ.सय्यद मुजीब मुसा | 321 |
| 82 | कौटुंबिक हिंसाचार : भारतीय महिला प्रा.डॉ.तोटे दादासाहेब सर्जेराव | 323 |
| 83 | महिलांचे प्रचिन मध्ययुगीन व आधुनिक जीवन<br>सौ चित्ररेखा रविंद्रनाथ जाधव | 326 |
| 84 | भारतीय राजकारण आणि महिलांचा सहभाग प्रा.डॉ.अर्जुन उबाळे | 331 |
| 85 | भारतातील लिंगाधारित अत्याचार आणि महिला विकास<br>प्रा डॉ सुनिता आत्माराम टेंगसे | 236 |



Lale Ramesh Warpudkar Colleege Sonpeth Dist. Parbhani (M.S.)

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - ((SJIF) -7.675, Issue NO, 265 (CCXLIII)
ISSN : 2278-9308
November, 2020

# भारतातील लिंगाधारित अत्याचार आणि महिला विकास

प्रा डॉ सुनिता आत्माराम टेंगसे
समाजशास्त्र विभाग प्रमुख कै रमेश वरपुडकर कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय सोनपेठ जिल्हा परभणी

**"जो देश, राष्ट्र महिलांना आदर देत नाही तो देश, राष्ट्र महान बनू शकत नाही व त्या देशाला, राष्ट्राला भविष्यही नसते" स्वामी विवेकानंद.**

व्यक्ती ,समाज आणि कुटुंब यांचे अस्तित्व स्त्री-पुरुषांच्या परस्पर प्रेम, सहकार्य,त्याग, सद्भावना यावर अवलंबून असते. स्त्री शिवाय पुरुष व समाज असू शकत नाही. आई, बहीण, पत्नी, प्रियसी विविध रुपात तिला कधीही पुरुषाने बरोबरीचा दर्जा दिलेला नाही.भारतीय समाजाचा विचार करता वैदिकपूर्व काळात नंतर काही काळ तिला बरोबरीचे स्थान होते असे कथा,दंतकथा पुराने यात आठळुण येते, परंतु बोटावर मोजण्याइतक्या स्त्रियांना मिळालेला प्रतिष्ठित सगळ्या स्त्रीच्या वाट्याला कधीच आलेला नाही. बहुतांश स्त्रियांच्या वाट्याला दुःख,निराशा आली आहे त्यांना कधीच स्त्री म्हणून प्रतिष्ठेने जगता आले नाही. स्त्रियांच्या वाट्याला आलेल्यां यातना, दुःख, बलात्कार अत्याचार, हत्या, आत्महत्या यासारख्या उपेक्षित जीवन वाट्याला आले, ते जवळपास भारतातील सर्व जाती, धर्म ,पंथ, गरीब ,मध्यम, श्रेष्ठ वर्गातील स्त्रिया पुरुषी अहंकार अत्याचाराच्या बळी ठरलेल्या आहेत. प्रामुख्याने स्त्री म्हणून तिच्याकडे बघण्याचा पुरुषांचा दृष्टिकोन, कुटुंबात मिळणारे दुय्यम स्थान, एक स्त्री म्हणून तिच्याकडे बघण्याचा पुरुषांचा दुय्यम दृष्टिकोण व कुटुंबात मिळणारे दुय्यम स्थान. कुटुंबाचा वारस म्हणून मुलाला असलेले महत्त्व, मुलीची होणारी अवहेलना,बालविवाह, कमी वयात मातृत्व, सासरच्यांचा शारीरिक मानसिक त्रास, त्यांचे वर्चस्व,पतीचे अकाली निधन, विधवांचे प्रश्न, विवाह वयातील फरक स्त्रीयांच्या समस्यांची संख्या मोजता येणार नाही एवढी आहे .प्रत्येक स्त्रीचे दुःख दुसऱ्या स्त्री पेक्षा वेगळे आहे, तरी त्या समस्यांची व्याप्ती कमी न होता वाढतच आहे. आधुनिक जीवनाच्या परिवर्तनशील आणि गुंतागुंतीचा समाज निर्माण झाल्यामुळे स्त्रियांच्या समस्या तोचतोपणा नाही तर त्यांच्यात व्यापकता आढळून येत आहे. आधुनिक समाजातील नवनवीन क्षेत्रे, मिळणाऱ्या संधी व स्त्रियांचा वाढता वावर यामुळे निर्माण होणाऱ्या समस्या ची संख्या उत्तरोत्तर वाढत आहे.

**शोधनिबंधाचे उद्देश:**

1. स्त्री हिंसाचाराची संकल्पना स्पष्ट करणे
2. स्त्रियांवरील कौटुंबिक हिंसाचाराचे स्वरूप स्पष्ट करणे
3. स्त्री हिंसाचाराचे कारने, परिणाम व उपाय जाणून घेणे

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - ( (SJIF) -7.675, Issue NO, 265 (CCXLIII)
ISSN : 2278-9308
November, 2020

***संशोधन पद्धती:**

प्रस्तुत शोधनिबंध साठी दुय्यम सामग्री चा आधार घेतलेला आहे. संदर्भग्रंथ, मासिके, वृत्तपत्रे,इंटरनेटच्या साह्याने माहिती प्राप्त करून विचारांची मांडणी केलेली आहे

***गृहीतक:**

आधुनिक भारतीय समाज व्यवस्थेत आजही स्त्री कौटुंबिक हिंसाचाराची बळी ठरते आहे.

आज एकविसाव्या शतकात प्रवेश करून पंधरा वर्ष पेक्षा जास्त कालखंड झालेला आहे. आजचे युग विज्ञान युग, संगणक युग आहे. आज ज्ञानाचा प्रचंड विस्फोट झाला आहे. शिक्षण खेड्यापाड्यात तळागाळापर्यंत पोहोचले आहे. स्त्री जीवन आमूलाग्र बदलले आहे. साहित्य, संगीत, नाट्य, चित्रपट, गायन, अंतराळ, संशोधन संस्था, सुरक्षा, प्रशासकीय सेवा इत्यादी सर्व क्षेत्रात स्त्रिया महत्वपूर्ण योगदान देत आहेत, हे उज्वल चित्र आहे तर दुसरे चित्र ही भयंकर आहे.निरक्षरता, स्त्रीदास्य, परंपरा, अंधश्रद्धा, हुंडाबळी, लैंगिक छळ,कौटुंबिक अत्याचार, स्त्री-भ्रूणहत्या, उन्हातान्हात काबाडकष्ट करणे या समस्यांनी ग्रस्त असणाऱ्या कोट्यावधी स्त्रिया हेही चित्र भारतात पाहायला मिळते. स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचारामुळे आज स्त्री घरातील सुरक्षित नाही आणि घराबाहेर तर नाहीच नाही. अशी दोन परस्पर विरोधी चित्र पाहायला मिळत आहेत या विविध समस्यांपैकी प्रस्तुत शोध निबंधातून स्त्रियांवरिल कैटूंबिक हिंसाचाराची या शोधनिबंधात मांडणी केलेली आहे.

**कौटुंबिक हिंसाचार:**

कुटुंब संस्थेमध्ये स्त्री आणि पुरुष हे दोन महत्त्वाचे घटक आहेत. पुरुषांच्या जीवनात स्त्रियांचे स्थान अत्यंत महत्त्वाच्या आहे ,परंतु स्त्रीची स्थिती आजही दयनीय आहे. समाजातील विविध रीतीरिवाज, मूल्य, नियमाने,विचार, परंपरा यामुळे स्त्रियांना अपमानीत,शोषित आणि यातनामय जीवन वाट्याला आले आहे. आजही अनेक अनिष्ट रूढी ,प्रथा, परंपरा नियमांनी स्त्रिया बांधल्या गेलेल्या आहेत. स्वातंत्र्योत्तर कालखंडात स्त्री रक्षणार्थ अनेक कायदे तयार करण्यात आले. शिक्षणाचा प्रसार झाला. स्त्रियांना अर्थार्जनाची संधी प्राप्त झाली असल्या तरीही स्त्री अजूनही आत्याचाराची बळी ठरत आहे. कुटुंबातील हुंडाबळी, शारीरिक मानसिक छळ, लैंगिक दुर्व्यवहार, मुलींचा गर्भ असेल तर गर्भपात करण्यास भाग पाडणे,विधवांना अपमानित करने, माहेरहून पैसे आणण्यासाठी प्रवृत्त करणे , अर्वाच्य भाषा वापरणे यासारख्या कृतींचा कैटुंबिक हिंसाचारात समावेश होतो. कुटुंबातील स्त्री विरुद्धचा हिंसाचाराच्या प्रकारात दिवसेंदिवस वाढ होत आहे .भौतिक प्रगतीच्या वाढत्या लेख बरोबरच स्त्रीयांवरील अत्याचार वाढताआहेत. स्त्री पुरुष समानता तत्त्व मान्य करूनही स्त्रिया पुरुषांच्या अत्याचाराला बळी पडत आहेत, त्यामुळे कौटुंबिक हिंसाचार ही एक सामाजिक समस्या बनली आहे

कौटुंबिक हिंसाचार म्हणजे काय हे जाणून घेताना कुटुंबातील किंवा घरातील एका व्यक्तीने दुसऱ्या व्यक्तीस शारीरिक दुखापत किंवा ईजा करणे असा वर्तन प्रकार पुन्हा पुन्हा करणे होय तसेच कौटुंबिक हिंसाचारात कुटुंबातील एका एका सदस्य ने दुसऱ्या किंवा अनेक व्यक्तीच्या विरोधात केलेला शारीरिक दुरुपयोग होय

कौटुंबिक हिंसाचाराची कारणे

1. पितृसत्ताक व्यवस्था:

पितृसत्ताक व्यवस्था म्हणजेच कुटुंबात ची सत्ता पुरुषांच्या हातात असून कुटुंब प्रमुख सर्वसत्ताधीश असतो, त्यामुळे सत्तेचा दुरुपयोग केला जातो व तो एखाद्या हुकूमशहा सारखा वागतो, या हुकूमशाही प्रवृत्तीमुळे कुटुंबातील इतर सदस्यां वर प्रामुख्याने स्त्रियांवर आणि लहान मुलांवर अन्याय अत्याचार होतो. पितृसत्ताक पद्धती मध्ये पुरुषांची स्थान श्रेष्ठ मानले जाते तर स्त्रियांचे स्थान हे कनिष्ठ असते. स्त्री ही पुरुषाच्या गुलाम समजली जाते त्यामुळे तिला मारहाण करण्याचा परवानाच पुरुषाकडे असतो अशी मानसिकता पुरुषांची बनलेले असते, या मानसिकतेतून पितृसत्ताक पद्धती मध्ये कौटुंबिक हिंसाचाराच्या घटना घडतात त्याचबरोबर स्त्रियांच्या संबंधित अनेक समस्या निर्माण होतात

2. हुंडा प्रथा:

विवाह प्रसंगी हुंडा देण्याघेण्याची पद्धती भारतीय समाजात आजही प्रचलित आहे, व तिचे मुळे खोलवर रुजलेली आहेत. हुंड्याची जेव्हा-जेव्हा वधूच्या आईवडिलांकडून मागणी पूर्ण केली जात नाही तेव्हा त्या मुलीचा नवरा, सासू-सासरे व इतर नातेवाईक तिला मारहाण करतात,तिचा छळ करतात. अनेक प्रसंगी तिचा बळी देखील घेतला जातो .वर पक्षाकडील मंडळी कोणत्या ना कोणत्या कारणास्तव वधु पक्षाकडे सतत पैशाची, भेट वस्तूची मागणी करत असतात. मागणी मान्य होत नसेल, पूर्ण होत नसेल तर तिला जाणीवपूर्वक त्रास दिला जातो व तिचा छळही केला जातो .थोडक्यात त्यामुळे कौटुंबिक हिंसाचारात वाढ होताना दिसून येते.

3. आर्थिक परावलंबन:

भारतीय समाजव्यवस्थेमध्ये पुरुषांचे स्थान स्त्रियांपेक्षा वरिष्ठ दर्जाचे मानले जाते. पुरुष कमवता असल्यामुळे तो आर्थिक दृष्ट्या सक्षम असतो. कुटुंबाच्या सर्व आर्थिक नाड्या त्याच्या हातात एकवटलेली असतात. स्त्री,मुले आपल्या सर्व प्रकारच्या खर्चासाठी सर्वस्वी पुरुषांवर अवलंबून असतात. आर्थिक परावलंबी वृत्तीमुळे, आर्थिक दृष्ट्या सक्षम असलेल्या पुरुष स्त्री आणि मुलांवर सत्ता गाजवीत असतात काही प्रसंगी त्याच्याकडून चुका झाल्यास तो त्यांना कठोर शिक्षा देखील देतो, त्यामुळे कौटुंबिक हिंसाचाराला चालना मिळते.

4.व्यसनाधीनता:

व्यसन आणि व्यसनाधीनता या बाबीअतिशय जवळच्या आहेत ,त्यामुळे अनेक प्रकारच्या समस्या निर्माण होतात. कुटुंबाची वाताहात होते. आणि कुटुंबातील सदस्य हे व्यसन असल्याने व्यसन पूर्तीसाठी घरातील वस्तू देखील विक्रीस काढतात ,एवढेच नव्हे तर घरातील सदस्य प्रामुख्याने पत्नी आणि मुलांना मारहाण केली जाते .काही पुरुष प्रसंगी मुलांचा आधार घेऊन स्त्री कडून पैसे काढण्याचा प्रयत्न करतात. नशेमध्ये आपण काय करतो याचे भान अनेक वेळा पुरुषांना नसते, या बाबीमुळे देखील कौटुंबिक हिंसाचारास प्रोत्साहन मिळते

5. स्त्रीला मूल न होणे:

Late Ramesh Warpudkar College Sonpeth Dist. Parbhani (M.S.)

स्त्रीला मूल होत नाही म्हणून स्त्रीवर अत्याचार आजही केला जातो. वास्तविक मुले होण्यास किंवा न होण्यास स्त्रीपेक्षा पुरुष अधिक जबाबदार असतो,परंतु अपत्य होत नसेल तर स्त्रीला आजही समाजात दुय्यम लेखले जाते, त्याच बरोबर फक्त मुलीच होत असतील तर त्यात सर्वस्वी स्त्रीला दोषी मानले जाते.मूल होत नाही किंवा फक्त मुलीच होत असणाऱ्या स्त्रियांचा छळ घरातील इतर व्यक्तींकडून आजही ग्रामीण तसेच शहरी भागात होतांना आढळून येतो, हा छळ करत असताना यावर वारंवार चर्चा करून त्या स्त्रीचे जगणे असाही असाहाय्य बनवले जाते. वेळ प्रसंगी तिला बदनाम देखील केले जाते.त्यामुळे कौटुंबिक हिंसाचाराच्या घटनांमध्ये वाढ होत आहे. याबरोबर पुरुषांची मानसिक विकृती, पुरुषांच्या संशयी स्वभाव आणि प्रेमविवाह यासारख्या घटनांमुळे कौटुंबिक हिंसाचाराची प्रकरणे उत्तरोत्तर वाढत आहेत

**कौटुंबिक हिंसाचाराची समस्या आणि उपाय:**

**कायदेशीर उपाययोजना:**

कौटुंबिक हिंसाचारास प्रतिबंध करण्याच्या दृष्टीने केंद्र सरकारने कौटुंबिक हिसाचार महिला संरक्षण अधिनियम 2005 कायदा संमत करून 26 ऑक्टोबर 2006 पासून लागू केलेला आहे, या कायद्यानुसार कौटुंबिक हिंसाचाराला बळी पडलेल्या कोणत्याही जाती, धर्मा तील स्त्री,18 वर्षाखालील मुले, संरक्षण अधिकारी म्हणून नेमलेल्या अधिकाऱ्याकडे किंवा पोलीस स्टेशन कडे तक्रार करू शकतात. न्यायदंडाधिकारी पीडित महिला स्वसंरक्षण देण्यासंबंधीचा आदेश काढू शकतात, या आदेशाचे पालन न करणाऱ्या एक वर्ष 20000 रुपये दंडही होऊ शकतो,या कायद्या अंतर्गत येणारे गुन्हे अजामीनपात्र व दखलपात्र मांडले जातात

*भारतीय दंड संहिता: कलम 498 अ नुसार हुंडा किंवा अन्य कारणांसाठी स्त्रियांना क्रूरपणे वागणूक दिल्यास आरोप असलेल्या व्यक्तीवर आपण निर्दोष आहोत हे सिद्ध करून देण्याची जबाबदारी टाकली असून हा गुन्हा दखलपात्र व अजामीनपात्र ठरवला आहे.

**महिला संघटना:** हुंडाबळी,कौटुंबिक हिंसाचाराने पिडीत महिलांना आश्रय आणि न्याय मिळवून देण्यासाठी अनेक महिला संघटना, शासकीय संघटना कार्यरत आहेत. कौटुंबिक हिंसाचाराच्या अनुषंगाने घडणाऱ्या कोणतेही प्रकारच्या घटनांमध्ये या संघटना थेट हस्तक्षेप करून पीडित महिलांना न्याय मिळावा याकरिता प्रयत्नरत आहेत.

जाणीव जागृती कौटुंबिक हिंसाचारास आळा घालण्याच्या दृष्टीकोनातून 'घंटा वाजवा' ही मोहीम राबविण्यात येत आहे. एखाद्या कुटुंबातील हिंसाचाराच्या संदर्भात परिस्थिती नियंत्रणाबाहेर गेली असेल तर पोलिस येईपर्यंत शेजारी यासंदर्भात हस्तक्षेप करू शकतात, त्यामुळे कौटुंबिक हिंसाचार रोखण्यात शेजाऱ्यांची मदत उपयुक्त होऊ शकते, या बरोबरच शासन, समाजसेवक, सामाजिक कार्यकर्ते व बिगर शासकीय संघटना इत्यादी कौटुंबिक हिंसाचाराच्या विरोधात जनतेमध्ये प्रसारमाध्यमांद्वारे जाणीव जागृती करण्याचा प्रयत्न करत आहेत .याबाबत समाजात जाणीव जागृती केली जात असली तरीही जोपर्यंत पुरुषप्रधान मानसिकतेत परिवर्तन घडवून आणले जात नाही तसेच स्त्रीकडे व्यक्ती म्हणून पाहण्याची प्रवृत्ती निर्माण होत नाही आणि स्त्रीमध्ये स्व अधिकाराबद्दल जागृती निर्माण केली जात नाही स्त्रियांवरील हिंसाचार आत्याचार

हा वाढतच जाणार आहे यासाठी पोलीस आणि न्यायव्यवस्थेत सुधारणा घडवून आणणे आवश्यक आहे स्त्रियांना आर्थिक स्वावलंबी बनवण्याचे देखील खूप गरजेचे आहे तसेच कौटुंबिक मानसिकतेत परिवर्तन घडवून आणणे आणि स्त्रियांच्या विकासाचे सामाजीकरण करून आणणे हे देखील तितकेच आवश्यक आहे.कौटुंबिक हिंसाचारास ज्याप्रमाणे सासरकडील मंडळी जबाबदार आहे त्याचप्रमाणे त्या पीडितेने सुद्धा कुटुंबात होणाऱ्या कौटुंबिक हिंसाचार सहन न करता ताबडतोब पोलिसांनी कायद्याच्या मदतीने अत्याचार करणाऱ्याविरुद्ध गुन्हा दाखल केला पाहिजे. स्त्रीने आपल्या घरातील व्यक्तींना आपल्यावर होणाऱ्या अत्याचाराची कल्पना दिली पाहिजे व त्यांना विश्वासात घेऊन प्रत्यक्ष किंवा कायद्यानुसार इतर अधिकारी यांच्याकडून समुपदेशन इतर मदतीसाठी मागणी केली पाहिजे अलीकडे महिलांवर बलात्कार कौटुंबिक हिंसाचार तसेच ऑनर किलिंग या अनेक प्रकारांनी महिलांवरील हिंसाचाराच्या संख्येत होणारी वाढ कमी करण्यासाठी कायदे व उपाय योजनांची अंमलबजावणी करून समाजातील प्रत्येक घटकाने आपली मानसिकता बदलणे गरजेचे आहे जोपर्यंत कुटुंबातील व्यक्ती विवाहित मुलीस आपली सून न मानता मुलीप्रमाणे माननार नाहीत तो तोपर्यंत खऱ्या अर्थाने महिलांवरील अत्याचार थांबणार नाहीत.

**सारांश:**

भारतात स्वातंत्र्योत्तर कालखंडात स्त्रियांचा दर्जा सुधारण्यासाठी स्त्रीला पुरुषाच्या बरोबर समान दर्जा देण्यासाठी विविध कायदे केले असले तरीही स्त्री-पुरुष समानतेचे तत्त्व व्यवहारात पूर्णपणे रुजलेले नाही. स्वातंत्र्योत्तर काळात स्त्रियांच्या स्थितीत बदल घडून आणण्यासाठी अनेक कायदे केले गेले या कायद्याची अंमलबजावणी मात्र प्रभावीपणे होऊ शकली नाही.कायद्याअंतर्गत अनेक पळवाटा असल्यामुळे स्त्रियांना न्याय मिळवून देण्यात अपयशी ठरत आहेत. आजही बालविवाह मोठ्या प्रमाणात केला जातात आजही महिलांना त्रास सहन करावा लागतो ,अनेक विधवा स्त्रियांना अपमानित जीवन जगावे लागते ,शुल्लक कारणामुळेच घटस्फोट घेऊन स्त्रीला बेघर केले जाते ,पाशवी नजरेच्या बळी जाणाऱ्या स्त्रियां बळी पडतात, आजही मुलीपेक्षा मुलाला कुटुंबात अधिक महत्त्व दिले जाते,मुलगी गर्भात आहे हे कळताच सुशिक्षित व्यक्ती सुद्धा त्या मुलीची हत्या करण्याची महीलेला बळजबरी करतात, व्यसनाधीन पतीबरोबर आयुष्य करताना दररोज जनावरासारखे मार खाण्याचा संख्या कमी होत नाही तर ती वाढतच आहे. हे सर्व स्त्रियांच्या दुय्यममत्वाचे स्वरूप आहे.हे बदलन्या साठी स्त्रीसुध्दा आपल्यासारखीच माणूस आहे याचा स्वीकार भारतातील प्रत्येक पुरुषाने करावा. तिला सुद्धा माणूस म्हणून हक्क आणि अधिकार आहेत याची जाणीव ठेवावी.स्त्री कडे पाहण्याचा दृष्टिकोन जोपर्यंत बदलत नाही तोपर्यंत कितीही कायदे केले, कितीही प्रबोधन केले तरीही त्याचा उपयोग होणार नाही आणि स्त्रीने सुद्धा आपल्यावर होणारा अन्याय सहन न करता त्याचा प्रतिकार करणेही तितकेच आवश्यक आहे.

संदर्भसूची:

1. संपादक प्रा मुठ्ठे पांडुरंग, महिला सक्षमीकरण स्वरुप आणि विकास, अरुण प्रकाशन, लातूर, 2016

2.आडे निर्मला, स्त्री आणि कायदा, आलोचना प्रकाशन, पुणे ,2004

3.उर्मिला बत्रा, महिला साक्षरता व सामाजिक परिवर्तन, मार्क पब्लिशर्स, जयपूर प्रथम संस्करण 2012

4.डॉ.गाठाळ भारतीय इतिहासातील स्त्रिया व स्त्री जीवन कैलास पब्लिशर्स

5.डॉ. भा.की खडसे भारतातील सामाजिक समस्या मंगेश प्रकाशन 2009

6.प्रा धारवाडकर, प्रा भालेराव ,भारतीय समाज समकालीन समस्या, रुद्राणी पब्लिकेशन हाऊस, भोकर ,महाराष्ट्र ,2017

7.ॲड.अरुन देशमुख, मानवी हक्क आयोग मनोरमा प्रकाशन, मुंबई, 2010

PRINCIPAL
Late Ramesh ... adkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani